## रे. दिवाणी मुकदमा नं. ६५१/२००८ मधील नि. १३५ वरील आदेश

(नारायण कृष्णा पोळ वि. निवृत्ती दादू पवार )

(**CNR**:**MHSN**12000022–2007)

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ९ चे वारस रेकॉर्डवर मुदतीत न आणल्याने त्याकामी झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४(५ब) प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. **वादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–**

सदर कामी प्रतिवादी क्र. ९ नानासो रामचंद्र पवार हे दिनांक २३/११/२०१९ रोजी सांगली येथील हॉस्पीटलमध्ये कोरोनाचा आजाराने मयत झाले असून त्यांचे वारस वेळेत रेकॉर्डवर न घेतल्याने अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. सदर अबेटमेंटचा आदेश रद्द करुन वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेला आहे. प्रतिवादी नं. ९ चे वारस रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. परंतु प्रतिवादी क्र. ९ नानासो रामचंद्र पवार मयत झाल्यानंतर न्यायालयाचे कामकाज कोवीड १९ चे कारणाने बंद होते. दावा स्थावरचा आहे. सदर प्रतिवादी क्र. ९ नानासो रामचंद्र पवार चे वारस रेकॉर्डवर घेण्यास ३ वर्षे ४ महिन्याचा विलंब झाला आहे. सदरचा विलंब माफ होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. तसे न झाल्यास प्रतिवादी यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. ९ चे वारस रेकॉर्डवर मुदतीत न आणल्याने त्याकामी झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात यावा अशी वादी यांनी विनंती केली आहे.

३. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादींनी म्हणणे दाखल केले नाही. सबब त्यांच्याविरुध्द विना म्हणणे अर्ज चालविणेत आला.

४. वादी तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी याकामी विलंब माफीचा अर्ज, अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज आणि अर्ज दुरुस्तीचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर कामी जर वादी यांचा अर्ज नामंजूर करणेत आला तर त्यांचे पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. परंतु सदरचा अर्ज मंजूर झाला तर प्रतिवादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी उपलब्ध असणार आहे. त्याचप्रमाणे अर्जाचे निराकरणासाठी त्याची

मदत होणार आहे. त्यामुळे वादीतर्फे कथनाचा विचार करता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा नि. १३५ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सदर कामी प्रतिवादी नं. ९ याचे वारस रेकॉर्डवर मुदतीत न आणल्याने त्याकामी झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN

Digitally signed by IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2024.07.18 10:55:10 +0530

**पलूस** **( आय. ए. वाय. ए. खान )**

**दिनांक–१६/०७/२०२४** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. Jyoti A. Salunkhe<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 16/07/2024 |
| Signed by P. O. on | : | 16/07/2024 |
| Uploaded on | : | 18/07/2024 |